



# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 | Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष –१८, अंक–२६ ■ छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. १० मार्च ते १६ मार्च २०२५ ■ किंमत २ रूपये, पाने –४


# टीम इंडियाने रचला इतिहास, जिंकला चॅम्पियन्स ट्रॉफीचा खिताब









**दुबई :** दुबईच्या मैदानावर टीम इंडियाने इतिहास रचला आहे. आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५च्या फायनल सामन्यात भारताने न्यूझीलंडला हरवत खिताब पटकावला आहे. न्यूझीलंडने फायनल सामन्यात भारताला विजयासाठी २५२ धावांचे आव्हान दिले होते. मात्र भारताने हे आव्हान बॉल राखत तसेच ४ विकेट राखत पूर्ण केले.

भारताने तिसऱ्यांदा चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली आहे. भारतीय संघाने सगळ्यात आधी २००२मध्ये चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली होती. तेव्हा त्यांनी श्रीलंकेसह संयुक्तपणे खिताब जिंकला होता. त्यानंतर एमएस धोनीच्या नेतृत्वात भारतीय संघाने २०१३मध्ये चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली होती. आता रोहित शर्माच्या नेतृत्वात भारताने इतिहास रचला आहे.

**रोहितची तुफानी खेळी, श्रेयस–राहुलची संयमी खेळी**

लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय संघाने दमदार सुरूवात केली. कर्णधार रोहित शर्मा आणि शुभमन गिलने पहिल्या विकेटसाठी १०५ धावांची शतकी भागीदारी केली. या भागीदारीदरम्यान रोहित शर्मा आक्रमक अंदाजात दिसला. रोहितने पाच चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने केवळ ४१ बॉलमध्ये अर्धशतकी खेळी केली. गिलने १ षटकाराच्या मदतीने ५० बॉलमध्ये ३१ धावा केल्या. यानंतर विराट कोहलीने स्वस्तात विकेट गमावली. त्याने केवळ १ धाव केली.

त्यानंतर संघाने रोहित शर्माची विकेट गमावली. रोहितने ८३ बॉलमध्ये ७६ धावा केल्या. यात सात चौकार आणि तीन षटकारांचा समावेश आहे. रोहित शर्मा बाद झाला तेव्हा भारताची धावसंख्या ३ बाद १२२ होती. रोहित बाद झाल्यानंतर अक्षर पटेल आणि श्रेयस अय्यरने मिळून चौथ्या विकेटसाठी ६१ धावांची भागीदारी करत टीम इंडियाला सांभाळले. श्रेयसने ६२ बॉलमध्ये ४८ धावा केल्या. तर अक्षर पटेलने २९ धावांवर आपली विकेट गमावली. तत्पूर्वी, न्यूझीलंडने टॉस जिंकत पहिल्यांदा फलंदाजीचा निर्णय घेतला. मात्र हा निर्णय त्यांच्यासाठी चुकीचा ठरला. न्यूझीलंडने पहिल्यांदा फलंदाजी करताना ५० षटकांत ७ बाद २५१ धावा केल्या.

न्यूझीलंडकडून डॅरेल मिचेलने सर्वाधिक ६३ धावा केल्या. त्याने यादरम्यान ३ षटकार ठोकले. तर मिचेल ब्रासवेलने नाबाद ५३ धावा ठोकल्या. या दोघांच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर न्यूझीलंडला अडीचशे धावांचा टप्पा गाठता आला. न्यूझीलंडची सुरूवात चांगली झाली होती. संघाचे अर्धशतक झालेले असताना त्यांनी पहिला विकेट गमावला. त्यानंतर दोन विकेट झटपट गमावल्यानंतर न्यूझीलंडने सावरले. डॅरेल मिचेलने डाव सावरला. एकीकडे विकेट पडत होत्या. मात्र डॅरेल मिचेल आणि ब्रासवेलने संयमी खेळी करत संघाला सन्मानजनक धावसंख्या गाठून दिली.

## तिकीट कन्फर्म असणाऱ्यांनाच मिळणार प्लॅटफॉर्मवर प्रवेश

**देशभरातील ६० प्रमुख रेल्वे स्थानकांवर हा नवीन नियम लागू**

नवी दिल्ली : भारतीय रेल्वे प्लॅटफफॉर्मवरील नियमांमध्ये बदल करण्यात आले आहेत. ज्या प्रवाशांचे तिकीट कन्फर्म झाले आहे, त्यांनाच आता रेल्वे स्थानकावर (प्लॅटफफॉर्मवर) प्रवेश दिला जाणार आहे. देशभरातील ६० प्रमुख रेल्वे स्थानकांवर हा नवीन नियम लागू केला जाईल. या नियमाची लवकरच अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे देखील भारतीय रेल्वेने म्हटले आहे.

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी उच्चपदस्थ रेल्वे अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला, ज्यामध्ये जास्त पादचाऱ्यांची गर्दी असलेल्या स्थानकांवर गर्दी व्यवस्थापनासाठी कार्यक्षम उपाययोजना केल्या पाहिजेत यावर सहमती झाली. बैठकीत जास्त रेल्वे प्रवासींची गर्दी असलेल्या स्थानकांवर गर्दी व्यवस्थापनासाठी कार्यक्षम उपाययोजना केल्या पाहिजेत यावर सहमती झाली. या नवीन धोरणाचे उद्दिष्ट विशेषतः गर्दीच्या हंगामात प्लॅटफफॉर्मवरील गर्दी नियंत्रणात आणणे हा आहे.

विशेषतः सुट्ट्या आणि सणांच्या काळात भारतीय रेल्वे स्थानकांवर सहसा गर्दी असते. बरेच लोक त्यांच्या नातेवाईकांना सोडण्यासाठी किंवा घेण्यासाठी रेल्वे स्थानकांवर येतात आणि यामुळे गर्दी वाढते. त्यामुळे रेल्वे स्थानकावरील गर्दी रोखण्यासाठी आणि प्रवाशांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी हे धोरण लवकरच लागू केले जाईल. देशातील मोठ्या शहरांमधील महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांवर लवकरच हे धोरण लागू केले होईल. या नवीन नियमांमुळे अनपेक्षित गर्दी टाळता येईल आणि प्रवाशांचा प्रवास सुरळीत होईल, असे भारतीय रेल्वे मंत्रालयाने म्हटले आहे. देशातील ६० मोठ्या रेल्वे स्थानकांवर हा नियम लागू केला जाईल. गर्दी नियंत्रणाच्या गरजेनुसार अतिरिक्त स्थानके यादीत समाविष्ट केली जातील, असे रेल्वे मंत्रालयाने सांगितले आहे.

## महिला दिनानिमित्त पंतप्रधानांकडून महिला शक्ती आणि कामगिरीला सलाम

**नवी दिल्ली :** महिला शक्ती आणि कामगिरीला सलाम म्हणून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचे सोशल मीडिया प्लॅटफफॉर्म विविध क्षेत्रात ठसा उमटवणाऱ्या यशस्वी महिलांना सोपवले आहे. आज आंतरराष्ट्रीय महिला दिनी, यशस्वी महिला पंतप्रधानांच्या सोशल मीडिया प्लॅटफफॉर्मवर त्यांच्या कथा आणि विचार सामायिक करीत आहेत. पंतप्रधानांच्या एक्स या समाजमाध्यमावरील अकाउंटवर यशस्वी महिलांनी पोस्ट केले की: ङ्गअंतराळ तंत्रज्ञान, अणु तंत्रज्ञान आणि महिला सक्षमीकरणः आम्ही दोघी अर्थात एलिना मिश्रा, अणुशास्त्रज्ञ आणि शिल्पी सोनी, अवकाश शास्त्रज्ञ आहोत आणि आम्हाला ङ्महिलादिनी पंतप्रधानांच्या सोशल मीडिया प्लॅटफफॉर्मचे नेतृत्व करताना खूप आनंद होत आहे. आमचा संदेश – भारत हे विज्ञानासाठी सर्वात चैतन्यशील ठिकाण आहे आणि म्हणूनच, आम्ही अधिकाधिक महिलांना ते शिकण्याचे आवाहन करतो.

## अमेरिकेत हिंदू मंदिराची तोडफोड; भारत सरकारकडून कठोर कारवाईची मागणी

**वॉशिंग्टन :** अमेरिकेत पुन्हा एकदा हिंदू मंदिरावर हल्ला झाला आहे. दक्षिण कॅलिफोर्नियातील बोचासनवासी अक्षर पुरुषोत्तम स्वामीनारायण संस्थेच्या (बीएपीएस) मंदिराची तोडफफोड करण्यात आली, तसेच भारतविरोधी मजकूर लिहून मंदिराला अपवित्र करण्याचा प्रयत्न केला गेला. या घटनेवर आता भारताने नाराजी व्यक्त करत यासाठी जबाबदार असलेल्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

बीएपीएस संस्थेने ट्विट करत या घटनेची माहिती दिली आहे. BAPS ट्विटर पोस्टमध्ये लिहिले की, कॅलिफोर्नियातील चिनो हिल्स येथील आणखी एका मंदिराच्या विटंबना. हिंदू समुदाय या द्वेषाच्या विरोधात ठामपणे उभा आहे. चिनो हिल्स आणि दक्षिण कॅलिफोर्नियातील समुदायासोबत, आम्ही द्वेषाला कधीही मुळ धरू देणार नाही. समान मानवता आणि श्रद्धा हे शांती आणि करुणा कायम प्रयत्न करत राहील.

या घटनेची नोंद घेत भारताने देखील निषेध नोंदवला आहे. परराष्ट्र मंत्रालयाचे अधिकृत प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले की, आम्ही कॅलिफोर्नियातील चिनो हिल्स येथे एका हिंदू मंदिरात झालेल्या तोडफोडीच्या नोंद घेतली आहे. अशा द्वेषपूर्ण कृत्याचा आम्ही तीव्र शब्दात निंदा करतो. आम्ही स्थानिक अधिकाऱ्यांना या कृत्यासाठी जबाबदार असलेल्या लोकांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे आणि पूजा स्थळांची योग्य सुरक्षा सुनिश्चित करण्याचे आवाहन करतो. दरम्यान, याआधी देखील अमेरिकेत हिंदू मंदिरांची तोडफोड करण्यात आल्याची घटना समोर आली होती. मंदिरांवर हिंदू नागरिकांच्या विरोधातील संदेश लिहिण्यात आले होते.

## २०३० पर्यंत राज्यात ५२ टक्के अपारंपरिक स्त्रोतांपासून ऊर्जा निर्मिती - मुख्यमंत्री

नागपूर : भारतीय व्यवस्थापन संस्था (आयआयएम) नागपूरमध्ये सौर ऊर्जा प्रकल्पाद्वारे या संस्थेसाठी लागणारी ऊर्जा निर्मितीची गरज पूर्ण होऊन संस्थेची नेट झिरो उद्दिष्टाकडे वाटचाल होणार असल्याचे प्रतिपादन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले. वर्ष २०३० पर्यंत राज्यात एकूण ऊर्जा निर्मितीपैकी ५२ टक्के ऊर्जा अपारंपरिक स्त्रोतांपासून निर्माण करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

येथील मिहान परिसरात स्थित आयआयएममध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते २ मेगावॅट क्षमतेच्या सौर प्रकल्पाचे भूमिपूजन व कोनशिलेचे अनावरण झाले, यावेळी ते बोलत होते. कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, आमदार डॉ.आशिष देखमुख, राज्य शासनाच्या विद्युत पारेषण कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.संजीव कुमार, आयआयएमचे संचालक डॉ. भिमराय मैत्री आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशासाठी ऊर्जा संक्रमणाचे उद्दिष्ट ठेवले आहे. या माध्यमातून पर्यावरणपूरक व नैसर्गिक स्त्रोतांपासून ऊर्जा निर्मितीचे कार्य देशात सुरु आहे. आयआयएम नागपूरनेही यादृष्टीने एक पाऊल पुढे टाकत सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचा संकल्प केला आहे. या प्रकल्पाची पायाभरणी होत असतांना नेट झिरो अर्थात आपली ऊर्जा गरज आपली भागवणे त्यातही अपारंपरिक ऊर्जा निर्मितीद्वारे स्वत:ची ऊर्जा गरज भागविण्याच्या दिशेने सुरुवात झाली आहे. यात कमीत कमी वा शून्य कार्बन उत्सर्जन हे पण उद्दीष्ट असते.

राज्य शासनानेही ऊर्जा संक्रमणाचे उद्दिष्ट गाठण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरु केले आहेत. राज्य शासन अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांपासून ऊर्जा निर्मितीला प्रोत्साहन देत आहे. वर्ष २०३० पर्यंत राज्यात ५२ टक्के ऊर्जा निर्मिती ही अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांच्या माध्यमातून करण्याचे उद्दिष्ट आहे आणि ते पूर्ण करण्यात येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते आयआयएम परिसरातील गोल्फ अकॅडमीच्या कोनशिलेचे अनावरणही यावेळी करण्यात आले. गोल्फ अकॅडमीद्वारे या संस्थेचा परिसर आंतरराष्ट्रीय दर्जाचा झाला असल्याच्या भावना मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केल्या.

# मनाच्या सर्व नकारात्मक भावना होळीला अर्पण कराव्यात!

आपल्या संस्कृतीतील एक सुंदर आणि मराठी कालगणनेनुसार वर्षाखेरीस येणारा एक महत्त्वपूर्ण सण. हा सण जीवनातील अनेक पैलूंना स्पर्श करून जातो. एकीकडे प्रत्येक माणूसच जगण्यात सप्तरंग शोधत असतो. सर्व रंग स्वत:मध्ये, आपल्या व्यक्तिमत्त्वामध्ये सामावून घेण्याची, त्यात माखून निघण्याची आंतरिक इच्छा प्रत्येकालाच असते. कोणाला ती साधते, तर कोणाला साधत नाही हा भाग वेगळा, पण बाहेरचा निसर्ग वसंतागमनाचे सोहळे साजरे करत असताना, झाडाझाडांवर फुलोरा दाटत असताना ते रंग आपल्याही तनूवर, वृत्तीवर लेऊन घेण्याचा एक बाह्य उपचार साजरा करणारा सण म्हणजेच होळी आणि रंगपंचमी. तसे पाहायला गेले, तर दररोजच भावभावनांचे वेगवेगळे रंग घेऊन आपण वावरत असतो. त्यातील काही आतपर्यंत झिरपलेले असतात, स्वभावात सामावलेले-समरस झालेले असतात, तर काहींचे वरपांगी लेपन झालेले असते. वेळ येईल, तसा स्वभावातील प्रत्येक रंग समोर येत आपला परिचय देत असतो. पण होळी आणि रंगपंचमी मात्र सगळे काही उघड उघड दाखवण्याची मुभा देऊन जाते. संस्कृतीची, अभिव्यक्तीची, अनावृत्त होण्याची ही 'सुसंस्कारित' सोय करून ठेवल्यामुळे भावनांचे विरजण होते आणि नागाने कात टाकून नव्या तकाकीने जळजळत सिद्ध व्हावे तसे तन-मन आगामी वर्षाच्या स्वागतासाठी सज्ज होते. त्यामुळेच परंपरेप्रमाणेच वाढत्या मानसिक आंदोलनांच्या आजच्या काळात या सणाचे सादरीकरण महत्त्वपूर्ण भूमिका बजावते, असे म्हणावे लागेल.

व्यक्त होणे ही मूळ प्रेरणा असली तरी बरेचदा परिस्थितीमुळे ती दाबून टाकणे क्रमप्राप्त ठरते. आपले आर्थिक, सामाजिक, नैतिक, भौतिक आदी प्रकारचे अस्तित्व टिकवण्यासाठी प्रत्येकाला एखाद्या रंगाचा बुरखा घालून जगण्याखेरीज पर्याय नसतो. ही अगतिकता काळानुरूप वाढत गेल्यामुळेच आचार आणि व्यवहारातील पूर्वीचा मोकळेढाकळेपणा हळूहळू हरपत गेला आणि एक प्रकारचे अस्तरातले जगणे आपण कवटाळू लागलो. मात्र त्यामुळे वाफ कोंडण्याचे प्रमाणही वाढले, कारण आयुष्याच्या धकाधकीत, जगण्याचा संघर्ष वाढत असताना हे सूत्र काही संपले नाही. पूर्वी चार शिव्या हासडून, ओरडाओरडा करून, रुसून-फुगून वा अन्य प्रकारे नाराजी व्यक्त करत ही कोंडी अनायसे फुटत असे. मात्र सध्याच्या तथाकथित 'सोफिस्टिकेटेड' जगण्याला ही संकल्पना रुचत नाही आणि परवडतही नाही. त्यामुळेच या ना त्या प्रकारे प्रत्येक दिवशी साजरा होत असला तरी होळीला 'शिमगा' गरजेचाच वाटतो. बदलत्या काळाने शिमग्याचे संदर्भही बदलवून टाकले आहेत ते असे.

देशाच्या विविध भागांमध्ये वेगवेगळ्या उपचारानिशी होळी साजरी होते. आपल्याकडे होळी अग्निदेवता म्हणून पूजली जाते. अग्नी हे तेजतत्त्वाचं प्रतीक आहे. तेजतत्त्वाचा एक महत्त्वाचा गुण म्हणजे ते प्रिय आणि अप्रिय अशा सगळ्यांनाच आपल्याजवळ घेते आणि त्यातून एक नवे तेज उत्पन्न होते. अज्ञान नाहिसे होणे आणि ज्ञानाचा स्वच्छ प्रकाश मिळणे याचा हा उत्सव असतो. त्यालाच आपण होळी पार्णिमा म्हणतो. पौर्णिमा या शब्दाचा आध्यात्मिक अर्थ खूप वेगळा आहे. चंद्र ही मनाची देवता मानतात. मनाच्या धारणा शुद्ध असतील तितकी प्रज्ञा काम करते. मनाचा नितळपणा प्रतिभेचा धर्म ठरतो. हाच नितळपणा आणण्यासाठी होळीच्या निमित्ताने आपण स्वच्छता करतो. परिसरातले, मनातले सूक्ष्म दोष नाहिसे होणे आणि नव्या वाटा चोखाळणे हा होलिकोत्सवाचा उद्देश आहे. एका अर्थाने हे देवीचे तेजस रूप आहे.

आदिवासी लोकांमध्ये हा उत्सव महत्त्वाचा मानतात. त्यांच्या दृष्टीने ती दिवाळीच असते. वृक्षाचा भला मोठा दांडा आणायचा, त्याभोवती गोवऱ्या, लाकडे लावायची, त्याचे पूजन करायचे आणि रात्रभर होळीची गाणी म्हणायचीः एका अर्थाने तो भावनांना वाट मोकळी करून देण्याचाच एक मार्ग असतो. अत्यंत बेहोशपणे नाचायचे, गायचे; परंतु शेवटी मात्र वसुंधरेविषयी कृतज्ञता व्यक्त करायचीः होळी पौर्णिमेच्या दिवशी साखरेचे हार आणि कंकण तयार करतात. ते होळीला त्याचबरोबर लहान मुलांनाही घालतात. आपल्या जगण्यात अधिक गोडवा येऊ दे आणि अवघे जगणेच सृष्टीचे गाणे होऊ दे, असा याचा अर्थ काढता येतो. कोकणातला शिमगा अत्यंत महत्त्वाचा असतो. विविध वाद्ये, झांजा घेऊन गावीगावी फिरत सर्वजण गाणी म्हणतात.

# भस्म होळी वाराणसी, जिथे रंगांऐवजी चितेच्या राखेने होळी खेळली जाते



होळी हा प्रामुख्याने रंगांचा सण आहे. पण भारतात अशी काही ठिकाणे आहे जिथे होळीचा उत्सव नेहमीच्या रंगांनी साजरा केला जात नाही तर तो वेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. होळी ही एका खास आणि विचित्र पद्धतीने साजरी केली जाते. काशी शहरातील अनोख्या होळीबद्दल तुम्हाला माहिती आहे का? जिथे रंगांऐवजी चितेच्या राखेने होळी खेळली जाते. जिला भस्म होळी वाराणसीतील मणिकर्णिका घाटावर साजरी केली जाते, जिथे होळी असे देखील संबोधले जाते. तसेच ही होळी रंगांनी नाही तर चितेच्या राखेने खेळली जाते. तर चला भस्म होळीशी संबंधित काही मनोरंजक तथ्ये जाणून घेऊया.

पौराणिक आख्यायिकानुसार भगवान शिव आणि देवी पार्वतीच्या विवाहानंतर देवी पार्वतीचा गौण सोहळा फाल्गुनच्या एकादशीच्या दिवशी झाला आणि ती त्याच्यासोबत शिवाच्या नगरीत आली. हा आनंद व्यक्त करण्यासाठी आजही भगवान शिवाच्या काशी नगरीत आमलकी एकादशीच्या दिवशी उत्सव साजरा केला जातो. या प्रसंगाचा आनंद व्यक्त करण्यासाठी, बाबांची पालखी काशीच्या रस्त्यांवर काढली जाते आणि सर्वत्र रंगीबेरंगी वातावरण असते, परंतु दुसऱ्या दिवशी हे रंगीत दृश्य पूर्णपणे बदलते.

भगवान शिव यांना स्मशानभूमीचे देवता देखील मानले जाते. असे म्हटले जाते की शिव हे विश्वाचे नियंत्रक आणि संहारक आहे. याकरिता स्मशानभूमीत भगवान शिवाची मूर्ती निश्चितच स्थापित केली जाते. संपूर्ण काशी शहरात एकादशीच्या दुसऱ्याच दिवशी शिवाला समर्पित चितेच्या राखेची होळी खेळली जाते. तसेच एक पौराणिक मान्यता आहे की भगवान शिवाचे भयंकर रूप दर्शविण्यासाठी, काशीतील मणिकर्णिका घाटावर होळीचे रंग म्हणून चितेच्या राखेचा वापर केला जातो. लोक चितेची राख एकमेकांवर लावतात आणि 'हर हर महादेव' जयघोष करतात. तसेच ढोल-ताशांच्या गजराने संपूर्ण दृश्य अद्वितीय दिसते. दरवर्षी होळीच्या सणात काशीमध्ये हे दृश्य पाहावयास मिळते.

तसेच अशी मान्यता आहे की, या दिवशी भगवान शिव स्वतः होळी साजरी करण्यासाठी काशीला येतात आणि चितेच्या राखेने होळी खेळतात. दरवर्षी काशीचे मुख्य स्मशानभूमी असलेल्या मणिकर्णिका घाटावर लोक बाबा मशननाथ यांना राख, अबीर, गुलाल आणि रंग अर्पण करतात. सर्वत्र डमरू वाजवण्याच्या आवाजात एक भव्य आरती केली जाते आणि लोक डमरू वाजवतात आणि मणिकर्णिका घाटावरील स्मशानभूमीतील जळत्या चितेतील राख एकमेकांना लावतात आणि होळी साजरी करतात.

तसेच काशी शहराला मोक्षनगरी असेही म्हणतात. विशेषतः होळीच्या वेळी ज्या व्यक्तीचे अंत्यसंस्कार केले जातात, त्यांना निश्चितच मोक्ष मिळतो असे मानले जाते. काशी शहर हे जगातील एकमेव शहर आहे जिथे माणसाचा मृत्यू देखील शुभ मानला जातो आणि अंत्ययात्रा देखील मोठ्या थाटामाटात पार पडते.

## होलिका दहनाच्या आगीत नारळ टाकल्याने वाईट नजरेचा प्रभाव नाहीसा होतो

सनातनच्या श्रद्धेनुसार होलिका दहनाचे अग्नि अत्यंत पवित्र मानले जाते. धार्मिक शास्त्रानुसार होलिका दहनाच्या अग्नीमध्ये कोणतीही वस्तू अर्पण केली तर तिच्या प्रभावाने शुभ फळ प्राप्त होतात.

परंपरेनुसार होलिका दहनाच्या अग्निमध्ये अनेक साहित्य अर्पण केले जाते, परंतु यापैकी काही अगदी सामान्य आहेत. होलिका दहनात अर्पण केलेल्या प्रत्येक पदार्थाचे स्वतःचे महत्त्व आणि प्रभाव असतो. अनेकजण होलिका अग्नीत नारळ टाकतात, त्याचे महत्त्व माहित आहे का?

असे मानले जाते की होलिका दहनाच्या अग्नीत नारळ जाळल्याने घरातील वाईट शक्ती, सर्व प्रकारच्या नकारात्मक शक्ती आणि समस्या त्या अग्नीत जळून राख होतात. ज्या व्यक्तीला कोणतीही शारीरिक समस्या किंवा कोणत्याही प्रकारची मानसिक समस्या असेल त्याच्या डोक्यावर नारळ ओवाळून अग्नीला अर्पण केले जाते. त्याचबरोबर असे मानले जाते की असे केल्याने देवी लक्ष्मी प्रसन्न होते आणि घरात धन आणि धान्याची कमतरता भासत नाही.

घरामध्ये कोणतीही समस्या असली किंवा काही नकारात्मक ऊर्जा तुम्हाला त्रास देत असली तरीही नारळ जाळल्याने समस्यांपासून मुक्ती मिळते, तसेच सर्व प्रकारची वाईट ऊर्जा स्वतःच निघून जाते.

घरातील तिजोरी भरायची असेल तर होळीला करा हे ५ उपाय- दुसऱ्या उपायानुसार होलिका दहनाच्या अग्नीत नारळासोबत कापूर जाळल्याने तुमच्या आयुष्यातील प्रलंबित काम पूर्ण होऊ लागते. जर काही अडथळे असतील किंवा जुने काम अडकले असेल, पैशाच्या आवकमध्ये अडथळा असेल तर तेही दूर करता येतात.

अस्वीकरण: येथे दिलेली माहिती ज्योतिषशास्त्रावर आधारित आहे आणि केवळ माहितीसाठी दिली जात आहे. वेबदुनिया याला दुजोरा देत नाही. कोणताही उपाय करण्यापूर्वी संबंधित विषयातील तज्ज्ञाचा सल्ला अवश्य घ्या.

## होलिका दहन कथा

हिरण्यकश्यप राक्षसी पुत्र होता. त्याने तपश्चर्या करून ब्रह्माकडून वरदान मिळवलेले होते. हिरण्यकश्यपने जेव्हा पृथ्वीला पटली नेण्याचा प्रयत्न केला तेव्हा विष्णूने वराह अवतार धारण करून त्याचा नाश केला. त्यामुळे भडकलेल्या हिरण्यकश्यपने विष्णूचे आपल्या राज्यात कोणी नाव घेऊ नये असे सगळ्यांना बजावले. हिरण्यकश्यप स्वत:ला श्रेष्ठ समजत असे आणि देवतांविषयी त्याला अतिशय तिरस्कार होता.



पण त्याच्याच घराण्यात जन्माला आलेल्या त्याचा मुलगा प्रल्हाद हाच मोठा विष्णुभक्त निघाला. प्रल्हाद बालपणापासून विष्णूचा (नारायणाचा) परमभक्त होता. प्रल्हाद दिवस-रात्र विष्णूच्या नावाचे नामस्मरण करीत असे. नेमके हेच हिरण्यकश्यपला मान्य नव्हते. त्यामुळे त्याने प्रल्हादाला त्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. परंतु, प्रत्येकावेळी तो अयशस्वी ठरला.

सगळे उपाय करून थकलेल्या हिरण्यकश्यपला त्याची बहीण जिचे नाव होलिका होते ती म्हणाली ' दादा, मला तुझा त्रास बघवत नाही.मला अग्नी देवाकडून असा वरदान आहे की मला आग जाळू शकत नाही.मी प्रल्हादला अग्नीत घेऊन बसते. मला वरदान असल्यामुळे मी जाळणार नाही पण तो जाळून खाक होईल.' हे ऐकून हिरण्यकश्यपने गावात नि वाळलेल्या काठ्याने मोठी पेढी तयार केली. त्यात होलिका प्रल्हादला घेऊन बसली. व शिपायांनी आग लावली. होलिका आपल्याच वरदानाच्या धुंधीत होती. परंतु, प्रल्हादाच्या भक्तिसाधनेमुळे उलटेच घडले. होलिकेचे अंग जाळू लागले. तिच्या अंगाचा दाह होऊ लागला. प्रल्हाद मात्र विष्णूच्या नामस्मरणात दंग होता. शेवटी जे व्हायचे तेच झाले. होलिका जाळून खाक झाली नि प्रल्हाद सुखरूप जिवंत राहिला. त्याच्या भक्तीने प्रसन्न होऊन विष्णूने खांबातून नृसिंह अवतार घेऊन हिरण्यकश्यपचा वध केला.

तेव्हापासून होळी जाळण्याची परंपरा सुरू झाली. असत्याला जाळून सत्याचा प्रकाश पसरविणे हा होलिका दहनामागील उद्देश आहे. म्हणून होळीला महत्त्व आहे.

# धर्म ध्वजारोहनाने सिध्दचक्र महामंडळ विधान प्रारंभ



छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

श्री.१००८ चंद्रप्रभु खंडेलवाल दिगंबर जैन मंदिर हडको येथे दिनांक ७ मार्च ते १४ मार्च पर्यत सिध्दचक्र महामंडळ विधानाचे आयोजन करण्यात आले आहे. असुन आज सकाळी धर्म ध्वजारोहनाने विधान सुरवात करण्यात आले. तसेच यावेळी शोभायात्रा काढण्यात आली विधानाचार्य म्हणुन संजयभैया कापडनावाले हे लाभले आहे.

या विधानासाठी मुख्य इंद्र इंद्राणी म्हणुन अरुणा रमेशचंद छाबडा यांना मिळाला आहे. दररोज सकाळी ७ वाजता भगवंताचा पंचामृत अभिषेक होईल. तदनंतर सिध्दचक्रप विधान पुजा होणार आहे. तसेच संध्याकाळी भगवंताची महाआरती होईल. ध्वजारोहण वेळी समाजबाधव ट्रस्ट अध्यक्ष कैलास कासलीवाल, दिलीप लोहाडे, राजकुमार बडजाते, संगीता बडजाते, अमित गंगवाल सुमन गंगवाल रमेश छाबडा अरुणा छाबडा राणी बाकलीवाल, सुमीत बाकलीवाल, किरण कासलीवाल, मीना पापडीवाल, सतिष ठोळे, डॉ. शैलेश चांदीवाल, संतोष पाटणी, अशोक अजमेरा, राजू लोहाडे, पंकज काला, दिनेश पाटोदी, रुपेश छाबडा, आशा कासलीवाल, कविता अजमेरा, अशोक पहाडे, संजय पाटणी, प्रकाश शेठी ज्योती सेठी, पुष्पा गंगवाल पुष्पा ठोळे मंजू पाटणी, राहुल कासलीवाल बबलू कासलीवाल, नीलिमा ठोळे, मीना कासलीवाल, रिदम पाटणी, पुष्पक बडजाते, संगीता काला, अक्षय काला. राजश्री कासलीवाल, अरुणा ठोळे, कल्पना पहाडे, सोनाली पांडे, कैलास काला, मुकेश गंगवाल, उज्वला अजम `रा, त्रिशला सेठी, कांता काला, सरला कासलीवाल आदी उपस्थित होते अशी माहिती नरेंद्र अजमेरा पियुश कासलीवाल यांनी दिली.

# ‘जितो लेडीज विंग’च्या विविध कार्यक्रमांना उत्स्फुर्त प्रतिसाद



छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

नेहमी सामाजिक व जनकल्याणकारी उपकम राबविणा-या जितो लेडीज विंग तर्फे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले याच अंतर्गत नुकतेच ग्लिस्टनिंग गोल्ड ज्वेलरी ची कार्यशाळा आयोजीत करण्यात आली होती. या कार्यशाळेम ध्ये दर्शना सेठीया यांनी सोन्या चांदीचे दागिने कसे ओळखावे व सोन्याचे विविध रंग यावर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेमध्ये ९८ महिलांचा सहभाग होता. तसेच स्टार्टअप पिच डे हा कार्यकम आयोजीत करण्यात आला. या प्रेरणादायी महिला उदयोजकांनी नविन स्टार्टअप व व्यवसायाबद्दल कल्पना दिली. यावेळी सागर गोसलिया व स्नेहा रायसोनी यांनी प्रेरणादायी महिला उदयोजकांच्या प्रवसातुन शिकण्याची संधी गुंतवणुकदार उदयोजक व इनोव्हेसोबत नेटवर्किंग तसेच विविध साक्षरता कार्यशाळा घेण्यात आली. यामध्ये सी.ए.रूपाली बोथरा यांनी सांगितले की पैसे कुठे व कसे गुंतवायचे तसेच गुंतवणुकीसाठी उपयुक्त कल्पना व माहिती व मनिमार्केटचे महत्व यावर मार्गदर्शन केले. तसेच कृती बुध्दीमत्ता व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये सुदर्शन कटारिया यांनी चॅट जि पी टी व ए आय टुल्स यावर माहिती दिली. यामध्ये ६५ महिलांनी कार्यशाळेत सहभाग घेतला होता व नविन तंत्रज्ञान शिकण्याचा आनंद घेतला. संपुर्ण कार्यकम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष प्रिया मुथा उपाध्यक्ष रितु जैन, प्रिती बाकलीवाल, सचिव सोनल जैन, सहसचिव सपना मुथियान, सारिका सेठी, कोषाध्यक्ष प्रियंका संघवी यांनी परिश्रम घेतले. संपुर्ण कार्यकमासाठी जितो लेडीज विंग चे सर्व सदस्य उपस्थीत होते.

# चल हल्ला बोल या चित्रपटाला सेन्सर बोर्डाने मान्यता द्यावी अन्यथा राज्यभरात निषेध व्यक्त करणार - नारायण बागडे!



छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

दलित, शोषित, वंचित, पिडितावरील अत्याचाराच्या विरोधात दलित पँथरचसारख्या चळवळीतून विद्रोही तलवार चमकवून आपल्या साहित्याद्धारे सम ाजाच्या वेदना वेशीवर टांगून अधोरेखित करणारे विद्रोही कवी पद्मश्री नामदेव ढसाळ यांच्या जीवनावर आधारित चल हल्ला बोल चित्रपटाला सेन्सर बोर्डाने परवानगी नाकारली आहे चित्रपाटातील मुख्य गाभा काढण्यात यावे ही अट घातली आहे हे कारण दलित विद्रोही कार्यकर्त्यांना पटणार नाही या चित्रपटाला नाकारणे दलित साहित्याच्या घोर अपमान आहे सेन्सर बोर्डाने त्वरित मान्यता द्यावी, अन्यथा राज्यभरात निषेध व्यक्त केला जाणार आहे, असे आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा चे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी माध्यमांना सांगितले.

बागडे पुढे म्हणाले हा चित्रपट प्रदर्शित झाला तर काही प्रस्थापित आंबेडकरी नेत्यांना आपल्या भविष्याची चिंता वाढणार आहे त्याच मुळे हे मुग गिळून बसले आहे ज्याचा एका आवाजावर चड्ड्या पिवळ्या होते होत्या त्याला सेन्सर बोर्ड मनतो कोण नामदेव ढसाळ हे मुर्खपणा कोनाच्या इशारावर केला आहे हे लवकरच कळणार आहेनामदेवराव यांनी गोलपीठा या कविता संग्रहातून दलित साहित्याच्या लेखणीतून शाई नाही रक्त दिले सेन्सर बोर्डाचे अधिकारी रेवणकर यांना काय माहित तो काळ काय होता या इतिहासाने आगीची फुंकार फुंकून अन्याय अत्याचार करणाऱ्यांना वठणीवर आणले या सेन्सर बोर्डाच्या अधिकाऱ्यांना त्वरित हकालपट्टी करा या साठी लवकर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा चे पदाधिकारी घेणार आहे असे हि बागडे यांनी सांगितले.

# आधुनिक भारताच्या उभारणीत स्त्रीयांचे योगदान महत्वाचे - सचिव डॉ. वैशाली जामदार

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

कुटुंबं व्यवस्था टिकविण्यासाठी आणी सांस्कृतिक मूल्य संवर्धानासाठी स्त्रीची भूमिका महत्वाची राहिली आहे, तसेच आधुनिक भारताच्या उभारणीत स्त्रियांचे योगदान महत्वाचे असल्याचे प्रतिपादन डॉ. वैशाली जामदार, विभागीय सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक परिक्षा मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी केले. पुढे त्यांनी आपल्या संस्कृतीमध्ये जे जे काही चांगले, पवित्र, उदात्त आहे ते सर्व स्त्रियांच्या सहभागाने साध्य झालेले आहे. असे सांगून सांस्कृतिक मूल्यांची जोपासना स्त्रियांनी जास्त प्रमाणात केली आहे तसेच या आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे महत्त्व सांगताना हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो असे सांगून या दिवशी विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा सत्कार केला जातो त्यांच्या कार्याचा गौरव केला जातो असे प्रतिपादन केले व तमाम महिला वर्गाला त्यांच्या स्वातंत्र्याची जाणीव होण्यासाठी हा दिवस साजरा केला जात असल्याचे सांगितले.

याप्रसंगी महाविद्यालयातील महिलांचा ग्रंथ देऊन त्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीताने डॉ. तुकाराम





वांढरे यांनी केली. प्रास्ताविक पर भाषणात उपप्राचार्य सुरेश लिपाने यांनी या कार्यक्रमाचा उद्देश, महत्त्व व महिलांचे समाजातील योगदान अनन्य साधारण असल्याचे सांगितले यांप्रसंगी डॉ. मनीषा नाईक, अनिता पुजारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य अशोक तेजनब कर यांनी महिलांचे सम ाजातील महत्त्वाचे योगदान आहे तसेच जागतिक स्त्रियांच्या कार्याचा आलेख हा उल्लेखनीयब असल्याचे सांगून संशोधनात। स्त्रियाचे योगदान महत्वपूर्ण असल्याचे नमूद केले

यांप्रसंगी कार्यक्रमाचे संयोजक उपप्राचार्य नंदकिशोर गायकवाड यांनी अशा कार्यक्रमाची उपयुक्तता असल्याचे सांगितले, यांप्रसंगी प्रा. वसंतराव जाधव, उपप्राचार्य नंदकिशोर गायकवाड, उपप्राचार्य विजय नलावडे , उपप्राचार्य सूरेश लिपाने, पर्यवेक्षक प्रा.रविंद्र पाटील, पर्यवेक्षक डॉ. सिमा पाटील ,अरुण काटे, ज्ञानेश्वर हिवरे, महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता स्नेहभोजनाने झाली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ जिजा शिंदे यांनी केले.

# विद्यार्थ्यांनी आपले कलागुण व क्षमता ओळखून त्यावर प्रेम करावे सुप्रसिद्ध अभिनेत्री गौरी नलावडे

## देवगिरी महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलनात केले प्रतिपादन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित देवगिरी महाविद्यालय, (स्वायत्त) छत्रपती संभाजीनगर वार्षिक स्नेहसंमेलन २०२४-२०२५ दिनांक १ मार्च २०२५ ते ७ मार्च २०२५ या कालावधीमध्ये महाविद्यालयातील कला, विज्ञान, वाणिज्य, जैवतंत्रज्ञान, संगणक शास्त्र, व्यवस्थापनशास्त्र या विविध शाखांचे वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते. त्यानिमित्ताने क्रीडा महोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम, आनंद नगरी, शेलापागोटे, पारंपरिक वेशभूषा स्पर्धा आदींचे आयोजन करण्यात आले होते. या विविध स्पर्धांचे दिनांक ७ मार्च २०२५ शुक्रवार रोजी दुपारी १२:३० वाजता वार्षिक स्नेहसंमेलनाचा समारोप व पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात होते. या पारितोषिक वितरण समारंभासाठी मुंबई येथील सुप्रसिद्ध सिने - मालिका अभिनेत्री मा. गौरी नलावडे या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. या पारितोषिक वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी मा.



पंडितराव हर्षे, ज्येष्ठ सदस्य, महाविद्यालय विकास समिती हे होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून मा. त्रिंबकराव पाथ्रीकर, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ मा. अनिल पटेल, महाविद्यालय विकास समिती, सदस्य व मा. नीलिमा सावंत, सदस्य, देवगिरी महाविद्यालय विकास समिती यांची प्रमुख उपस्थिती होती. व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफ ेसर डॉ. अशोक तेजनकर, उपप्राचार्य डॉ. रवी पाटील, उपप्राचार्य डॉ.अपर्णा तावरे, पारितोषिक वितरण समारंभाचे समन्वयक तथा उपप्राचार्य डॉ. गणेश मोहिते यांची उपस्थिती होती.

या प्रसंगी विद्यार्थ्यांची संवाद साधताना सिने अभिनेत्री गौरी नलावडे म्हणाल्या की, तारुण्याचे वय हे खरे कलागुण जोपासण्याचे वय आहे असे मी मानते. कारण मी याच संस्कारातून घडली आहे. माझी आई माझ्या कलागुणांना सातत्याने वाव देण्यासाठी माझी पाठ राखण करत होती. आपणही तरुण आहात विद्यार्थी वयामध्ये आपल्यामध्ये असणाऱ्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी वार्षिक स्नेहसंमेलनासारखे व्यासपीठ महाविद्यालय आपणास उपलब्ध करून देत असतात. या व्यासपीठातूनच आपण आपल्या कलागुणांना वाव दिला पाहिजे. कलागुण जोपासले पाहिजे असे ते म्हणाल्या.

# अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ छत्रपती संभाजीनगरतर्फे गरजवंत ८७ महिलांना साड्या वाटप



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ छत्रपती संभाजीनगरतर्फे गरजवंत ८७ महिलांना साड्या वाटप. आज जागतिक महिला दिवस त्याचे निम्मित साधून बालाजिमंदिर कोटलाकोलणी येथे हा कार्यक्रम घेण्यात आला. धूनी भांडी करणाऱ्या महिलांचा हा सन्मान आमच्या साठी महत्वाचा शेवटी त्यांचे कोड कौतूक करणे हे सामाजिक कर्तव्य असे आम्ही समजतो असे प्रतिपादन जिल्हाध्यक्ष सुधीर नाईक ह्यांनी केले. ह्या वेळी सुचेता पालोदकर ह्यांनी महिला सबलीकरण करणाऱ्यासाठी आमचे पुढचे पाऊल असणार असे ही सांगितले.प्रथम आलेल्या सर्व महिलांचे औक्षण करून हातात गुलाब फुलं व पेढा आणि साडी देऊन सन्मान करण्यात आला...ह्या वेळी जिल्हा सचिव स्मिता जोशी उपाध्यक्ष स्मिता नगरकर.अंजली गोरे सीमा नांदापूरकर दिलीप लाड गायत्री न्यायाधीश अंजली देशपांडे श्री व सौ अदवंत, पिंप्रिकर गुरुजी, कपिल पिंपरीकर मनू जोशी पूनम जोशी, मोहन काळेसह सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

# न्यू गुरुकुल इंग्लिश स्कूल वाहेगाव येथे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

२८/०२/२०२५ रोजी गंगापूर तालुक्यातील वाहेगाव येथील न्यू गुरुकुल इंग्लिश स्कूल या शाळेत विज्ञान दिन साजरा करण्यात आला. त्यामित्ताने शाळेत विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन रिबीन कापून करण्यात आले होते. मुलांनी विविध विज्ञान प्रकल्प जसे कि स्मार्ट विलेज, सिटी, रेन वॉटर स्टोरेज, ज्वालामुखी, ट्रॅफिक सिग्नल पाण्यातील जहाज अश्या अनेक प्रकल्प सादर केले. त्यासाठी शाळेतील शिक्षक विशाल माने समीर शेख, आकाश खामकर, हसन शहा, शफिक शेख, महेश सोनवणे, प्रियंका हिवाळे, ख्रिस्तीना गणराज, मिस पाटील, कलिम शहा, शेख, संध्या हिवाळे, वालतुरे, तगरे, गोरे आदी शिक्षक व कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले. शाळा संचालक श्री. बाबसाहेब हिवाळे, मुख्याध्यापक श्री. अरुण शिरसाठ आणि व्यवस्थापक श्री. दीपक गणराज यांनी मार्गदर्शन केले.

# जिल्हाधिकारी कार्यालयातील नारीशक्तीची मोटारसायकल रॅली

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

जागतिक महिला दिनानिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयातील नारीशक्तीची मोटारसायकल रॅली आयोजीत करण्यात आली. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते झेंडी दाखवून ही रॅली रवाना करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयातील महिला अधिकारी कर्मचारी या रॅलीत सहभागी झाल्या. उपजिल्हाधिकारी डॉ. सुचिता शिंदे, संगिता राठोड तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील महिला कर्मचारी अधिकारी




यावेळी उपस्थित होत्या. जिल्हाधिकारी कार्यालयातून सकाळी साडेनऊ वा. ही रॅली निघून क्रांती चौकात या रॅलीचा समारोप झाला.

# उद्योजकांसाठी पोषक वातावरण निर्मिती करून मराठवाडा सुजलाम सुफलाम करण्यासाठी सर्व मिळून प्रयत्न करूया - विभागीय आयुक्त दिलीप गावडे

## गुंतवणूकदार, उद्योजक, यांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्याच्या अनुषंगाने संवाद

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

उद्योगांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रशासन आपल्या सोबत आहे, रस्ते, वाहतूक, पार्किंग प्रश्न, पाणी, वीज, उद्योग सुरक्षा सोडविण्यासह आवश्यक त्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे. उद्योजकांसाठी पोषक वातावरण निर्मिती करून मराठवाडा सुजलाम सुफलाम करण्यासाठी सर्व मिळून प्रयत्न करूया, असे प्रतिपादन विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी आज केले.

छत्रपती संभाजीनगर विभागातील गुंतवणूकदार, उद्योजक, शासनाच्या विविध प्रकल्पांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्याच्या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर विभागातील आठही जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक तसेच उद्योग विभागाशी संबंधित असलेल्या विभागाचे विभाग प्रमुख, उद्योजक तसेच उद्योजक प्रतिनिधी यांची बैठक ऑरिक सीटी शेंद्रा येथे विभागीय आयुक्त श्री. गावडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र, छत्रपती संभाजीनगरचे पोलीस आयुक्त प्रविण पवार, विभागातील आठही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी तसेच पोलीस अधीक्षक उपस्थित होते. बैठकीत संवाद साधताना श्री. गावडे म्हणाले, उद्योजक, गुंतवणूकदार यांच्या अडचणी दूर करण्यासाठी जिल्हास्तरावर बैठका घेण्यात याव्यात तसेच गुंतवणूकदार उद्योजकांना येणाऱ्या अडचणीचे निराकरण तसेच कायदा व सुव्यवस्था या बाबींची प्रभावीपणे हाताळणी करा, असे निर्देश त्यांनी यंत्रणेला दिले.

राज्यस्तर व केंद्रीय स्तरावरील विषय निवेदनाद्वारे राज्यस्तरीय समितीला देऊन आवश्यक ते बदल करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील.

उद्योजक संघटनांशी चर्चा करुन त्यांना येणाऱ्या अडचणींचे तातडीने निराकरण संबंधित विभागाकडून तत्परतेने करण्यात येईल, असा विश्वास देत विभागीय आयुक्त श्री. गावडे यांनी गुंतवणूकदारांच्या अडचणी समजून घेत अडचणी सोडविण्यासाठी संबंधित विभागाला सूचना दिल्या. प्रारंभी जागतिक महिला दिनानिमित्त उपस्थित असलेल्या लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जालन्याच्या प्रभारी जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार तसेच पोलीस उपअधीक्षक पुजा नानगरे यांचा प्रातिनिधीक स्वरूपात सत्कार करण्यात आला. धाराशिवचे पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे प्रशासनाची भूमिका विशद केली. बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी उद्योजकांनी आणि प्रशासनाने करावयाच्या आठ सूत्री कार्यक्रमाबाबत माहिती दिली. तसेच या अनुषंगाने प्रशासकीय पातळीवर सर्वच अधिकाऱ्यांनी उद्योजकांना सर्वोतोपरी मदत करण्याबाबत आवाहन केले. छत्रपती संभाजीनगर, जालना, लातूर, धाराशिव, हिंगोली आणि नांदेड जिल्हाधिकारी तसेच पोलीस अधीक्षक यांनीही चर्चेत सहभाग घेऊन प्रशासनाची भूमिका विशद केली. प्रकल्पातील सामानाची चोरी, रस्ता अडविणे, बेकायदेशीर बाबींची मागणी करणे इत्यादी बाबत तात्काळ तक्रार करावी. संबंधितांवर कायदेशीर कारवाई करणे सोपे होते. उशिराने तक्रार केल्यास गुन्हेगारास पकडण्यास विलंब होतो, उद्योजकांनी त्यांच्या औद्योगिक परिसरात सुरक्षा कुंपन करणे, सीसीटीव्ही कॅमेरे लावणे, खाजगी सुरक्षा रक्षकांची नेमणूक करणे, खाजगी पेट्रोलिंगची व्यवस्था याबाबत उद्योजकांशी चर्चा केली. औद्योगिक क्षेत्राचे सुरक्षा ऑडिट करणार असे विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र यांनी सांगितले. उद्योकांना आवश्यक असलेल्या चांगल्या वातावरणासाठी पोलीस विभागाचे पोलीस विभागाचे सर्वोतोपरी प्रयत्न राहील असे पोलीस आयुक्त प्रविण पवार यांनी सांगितले. वाळुज इंडस्ट्रिज असोसिएशन, मराठवाडा चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री, मसिआ, सिमिया, सीआयआय, डब्लुआयए, लघुउद्योग भारती, देवगिरी इलेक्ट्रानिक क्लस्टर, मराठवाडा ऑटो क्लस्टर, मॅजिक, तसेच आठही जिल्ह्यातील विविध असोसिएशनचे पदाधिकारी तसेच विविध औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी बैठकीस उपस्थित होते.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com.